# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला
## कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा

**प्राचार्य**
डॉ. सतिशचंद्र मा. जाधव
एम.एस.सी., पीएच.डी. (मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र)

दुरध्वनि क. (कार्या.) ९८५०३७३७६४
ईमेल : atsbuldana@gmail.com

जा.क्र./कृतंविबु./ 89 /२०२३-२४
कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा
दिनांक : २८/०८/२०२३

**दर पत्रक पुरविने बाबत सुचनापत्र**

प्रति,

१. ______________________ २. ______________________

३. ______________________ ४. ______________________

**विषय : सन २०२३-२०२४ करिता भाडे तत्वावरील खाजगी ट्रॅक्टरने / बैलजोडीने कार्यालयाचे प्रक्षेत्रावरील मशागतीची/मळणीचे दैनंदीन विविध कामे करण्याकरीता दर मागविणे बाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा या कार्यालयाचे प्रक्षेत्रावर सन २०२३-२०२४ या वर्षात ट्रॅक्टरने/ बैलजोडीने शेतीचे दैनंदीन मशागतीचे/मळणीचे विविध कामे करण्याकरिता इच्छुक ट्रॅक्टर धारक/मालकाकडून प्रती हेक्टर प्रमाणे खालील नमुद केल्या प्रमाणे दर मागविण्यात येत आहेत.

**अ) खरिप, रब्बी व उन्हाळी हंगाम सन २०२३-२०२४ करिता प्रक्षेत्रावरील दैनंदीन विविध कामे खाजगी तत्वावर भाडयाच्या ट्रॅक्टरने करण्याकरीता मागविलेल्या दराचे विवरण खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कामाचे विवरण | प्रकार | दर प्रती हेक्टरी रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | नांगरटी | २ फाळी पलटी | | |
| २ | नांगरटी | ३ फाळी पलटी | | |
| ३ | पंजीवाही | ५ फाळी | | |
| ४ | ति-वाही | ३ फाळी | | |
| ५ | फंटावाही | ९ फाळी | | |
| ६ | पासावाही | ३ पासा | | |
| ७ | पट्टीपास जांभूळ वाही | एकपास | | |
| ८ | रोटाव्हेटर | ५ फुट | | |
| ९ | पेरणी पट्टीपाससह | ट्रॅक्टरचलित पेरणी यंत्राने | | |
| १० | पेरणी विनापट्टीपास | ट्रॅक्टरचलित पेरणी यंत्राने | | |
| ११ | फवारणी | ट्रॅक्टरचलित बुम स्प्रेपंप | | |
| १२ | फवारणी | पॉवर स्प्रे/पाठीवरील हस्त चलित | | |
| १३ | डवरणी | ट्रॅक्टर व दोन ओळीतील अंतर | | |
| | अ. डवरणी | ४५ सें.मी. | | |

28-8-2023
प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब. डवरणी | ६० सें.मी. | | |
| | क. डवरणी | ९० सें.मी. | | |
| | ड. डवरणी | १२० सें.मी. | | |
| १४ | पिकांची मळणी | ट्रॅक्टर व डीझेल इंजीनचलित थ्रेशरने मळणी दर प्रती क्विंटल रूपये. | | |
| | सोयाबीन | | | |
| | ज्वारी | | | |
| | मका | | | |
| | तूर | | | |
| | मुंग | | | |
| | उडीद | | | |
| | हरभरा | | | |
| | गहु | | | |
| | जवस | | | |

**ब) खरिप, रब्वी व उन्हाळी हंगाम सन २०२३-२०२४ करिता प्रक्षेत्रावरील दैनंदीन विविध कामे खाजगी तत्वावर भाडयाच्या बैलजोडीने करण्याकरीता मागविलेल्या दराचे विवरण खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कामाचे विवरण | प्रकार | दर प्रती हेक्टरी रूपये |
|---|---|---|---|
| १ | बैलचलित यंत्राने सोयाबीन, ज्वारी, मका, तीळ, मुंग, उडीद इ.पिकांची पेरणी करणे. | ४५ सें.मी.अंतर | |
| २ | बैलचलित यंत्राने सोयाबीन, ज्वारी, मका, तीळ, मुंग, उडीद इ.पिकांची पेरणी करणे. | ६० सें.मी.अंतर | |
| ३ | बैलचलित यंत्राने कापूस व तूर इ.पिकांची पेरणी करणे | ९० सें.मी.अंतर | |
| ४ | बैलचलित यंत्राने काकर चौफूली पाडणे | अ)४५x४५ सें.मी.१.५ फूट अंतर चौफूली<br>ब)६०x४५सें.मी अंतर चौफूली | |
| ५ | बैलचलित डवरणी (आंतर मशागत) | अ)४५ सें.मी. डवरणी<br>ब)६० सें.मी डवरणी | |
| ६ | बैलचलित वखर (आंतर मशागत) | ९० सें.मी डवरणी | |

भाडे तत्वावर ट्रॅक्टर व बैलजोडीच्या साहाय्याने करावयाच्या कामाबाबत सविस्तर अटी व शर्ती खालील नमूद केलेले आहे.दरपत्रक सादर करतेवेळी लिफाफ्यावर ट्रॅक्टर/ बैलजोडी मालकाचे नांव, पत्ता व संपर्क क्रमांक ई.चा स्पष्ट उल्लेख असावा. तरी इच्छुक ट्रॅक्टर/ बैलजोडी धारक मालकांनी उपरोक्त प्रमाणे दर तक्त्याच्या प्रमाणे दरपत्रक या कार्यालयाला दिनांक: १०.५.२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते संध्याकाळी ५.४५ लिफाफाबंद स्वरूपात स्पष्ट सुटसुटीत अक्षरात सादर करावेत. आवश्यक सर्व अटी पूर्ण करणा-या ट्रॅक्टर/ बैलजोडी धारकांचाच काम करून घेण्यास विचार करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

टीप: इच्छुक ट्रॅक्टर मालकांनी दरपत्रक सादर करतेवेळी ट्रॅक्टरच्या आर.सी.बुक ची झेरॉक्स देणे अत्यावश्यक राहील.

28-4-2023

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय
बुलढाणा

प्रतिलिपी: सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, सागवन ता.जि.बुलढाणा यांना विनंती की, सदर निविदा आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व्यापक प्रसिध्दी करिता लावण्यात यावी.

Scanned with CamScanner

अटी व शर्ती:

१. प्रक्षेत्रावर काम करतांना काम समाधानकारक झाल्याची खात्री करूनच देयक अदा करण्यात येईल.

२. ट्रॅक्टर व वापरत असलेले अवजारे सुस्थितीत असने अत्यावश्यक आहे.

३. ट्रॅक्टरने करावयाचे सर्व कामे हे कार्यालयीन वेळेतच सकाळी ९.४५ ते संध्याकाळी ५.४५ या वेळेत करावी लागतील.

४. कार्यालयाचे ज्या प्रक्षेत्रावर काम उपलब्ध असेल त्याच प्रक्षेत्रावर काम करावे लागेल.

५. प्रक्षेत्रनिहाय नेमून दीलेले काम वेळेत पूर्ण करावे लागेल. काम अर्धवट सोडून दील्यास सदरचे कामाचे देयक अदा करण्यात येणार नाही.

६. ट्रॅक्टर/ बैलजोडीने प्रक्षेत्रावर काम करीत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान, जिवीत हानी अथवा अपघात झाल्यास कार्यालय जबावदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबावदारी ट्रॅक्टर/ बैलजोडी मालकाची राहील.

७. ट्रॅक्टरने काम करीत असतांना प्रक्षेत्रावर विद्यापीठाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होनार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी. नुकसान झाल्यास ट्रॅक्टर/ बैलजोडी मालकास जवावदार धरण्यात येवून नुकसान भरपाई करण्यात येईल.

८. दरपत्रक सादर करतांना दरांचा सर्व कर व सेवा शुल्कसहीत स्पष्ट उल्लेख करावा. नमुद केलेल्या दरा व्यतीरीक्त व्यतीरीक्त इंधन, दुरूस्ती व ट्रॅक्टरचलीत साहीत्य व कोणतेही शुल्क अदा केल्या जाणार नाही. खोडतोड असलेले दरपत्रक स्विकारल्या जाणार नाही व तशे दरपत्रक रदद करण्यात येईल.

९. प्रक्षेत्रावर नेमून दीलेले काम समाधानकारक व पर्ण झाल्यावर देयकाची संपूर्ण प्रक्रिया झाल्यावरच देयक खर्च अदा करण्यात येईल. ट्रॅक्टरचालक हा विहीत परवानाधारकच असावा.

१०. ट्रॅक्टर/ बैलजोडीने प्रक्षेत्रावर कामझाल्यावर सदरचे ट्रॅक्टर/ बैलजोडी मालकाने प्रक्षेत्रावर केलेल्या कामांचे देयक दोन प्रतीत विनाविलंव सादर करावे. देयकासोवत आपला वॅक खाते क्रमांक पूर्ण माहीतीसह सादर करावे.

**उपरोक्त प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असणा-या ट्रॅक्टर/ बैलजोडी मालक धारकांनीच दरपत्रक सादर करावेत.**

28-4-2023

**प्राचार्य**
**कृषि तंत्र विद्यालय**
**बुलढाणा**

Scanned with CamScanner